**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०६/०२/२०२६

**वसई विरार शहर महानगरपालिकेत 'जनगणना २०२७' चे पहिले प्रशिक्षण संपन्न**
**जनगणनेच्या कामासाठी घरी येणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करण्याचे मा.आयुक्तांचे नागरिकांना आवाहन**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात होणाऱ्या 'जनगणना २०२७' चे पहिले प्रशिक्षण दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात पार पडले. जनगणना कार्य निदेशालय महाराष्ट्र यांच्या वतीने 'जनगणना २०२७' विषयक कार्यवाही सुरु होत असून, त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेचे चार्ज अधिकारी व जनगणनेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण शिबीर दि.०६ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयातील सभागृहात संपन्न झाला.
जनगणना हा देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया मानला जातो. जनगणनेच्या माध्यमातून देशाच्या लोकसंख्येचा अचूक आकडा मिळतो, ज्यावरून शासनाला विविध योजना व ध्येयधोरणे यांचे नियोजन करता येते. गेल्यावेळी सन २०११ मध्ये जनगणना झाली होती. त्यानंतर सन २०२१ मध्ये जनगणना होणे अपेक्षित होते, परंतु कोरोना महामारीमुळे त्यावेळी जनगणना होऊ शकली नाही, ती आता सुरु होत आहे.
जनगणना २०२७ च्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेत आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या प्रशिक्षणामध्ये जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात करावयाच्या कामाची सविस्तर माहिती सहाय्यक संचालक जनगणना श्री.प्रवीण भगत आणि जनगणना अधिकारी श्री.मिलिंद पाटील यांनी सादरीकरणाद्वारे दिली. जनगणनेचे कामकाज करणेसाठी प्रगणकांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांवर निरीक्षण करणेसाठी पर्यवेक्षकांचीही नियुक्ती करण्यात येणार आहे. महानगरपालिका आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) हे प्रधान जनगणना अधिकारी असून, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे हे अतिरिक्त प्रधान जनगणना अधिकारी, उप-आयुक्त श्रीम.हर्षला राणे ह्या शहर जनगणना अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडतील. महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त हे त्या विभागाचे चार्ज ऑफिसर म्हणून काम करणार आहेत. जनगणना २०२७ च्या अनुषंगाने घरगणना (House Listing) कामकाजास पहिल्या टप्प्यात सुरुवात होणार असून, त्याचे पहिले प्रशिक्षण संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आले.
'जनगणना २०२७' ही देशाची १६ वी जनगणना असून ही देशाच्या इतिहासातील पहिली डिजिटल जनगणना आहे. यामध्ये मोबाईल ॲपद्वारे माहितीची नोंदणी होणार आहे. या जनगणनेची वैशिष्ट्ये म्हणजे जनगणना माहितीचा जलद प्रसार, जात प्रगणना, डिजिटल माहिती संकलन, स्व-गणना पोर्टल इ. आहेत. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर यादी गटानुसार माहिती संकलित केली जाणार असून, दुसऱ्या टप्प्यात नागरिकांची इतर माहिती संकलित केली जाणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी जनगणना कामकाजासाठी घरी येणाऱ्या प्रगणकांना योग्य माहिती देऊन जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यात संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी(भा.प्र.से.) यांनी केले आहे.